Scan QR code to visit... Epaper Portal

www. sahyandrinews.com

# दैनिक सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक २०२ • Title - Code :- MAHMAR49513 • रविवार दि.२८ एप्रिल २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# काँग्रेसला ओबीसी समाजाचे आरक्षण मुस्लिम समाजाला द्यायचे आहे-पंतप्रधान मोदी




**उत्तर प्रदेश । प्रतिनिधी**

विरोधकांच्या तुष्टीकरणाच्या राजकारणाने देश तुकड्या - तुकड्यात विभागला गेला असून प्रामाणिक लोकांच्या हक्कांवर गदा आणली गेली आहे. भाजपचा मार्ग तुष्टीकरणाचा नसून सर्वांच्या कल्याणाचा आहे, तर काँग्रेसची इंडी आघाडी खोलवर तुष्टीकरणात गुंतलेली आहे. काँग्रेसने जारी केलेला जाहीरनामा विशिष्ट समाजाची मतपेढी जपण्यासाठी समर्पित असून त्यावर १०० टक्के मुस्लिम लीगचा प्रभाव दिसून येतो, अशा परखड शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज काँग्रेसवर नवा हल्ला चढविला.

उत्तर प्रदेशातील आग्रा, आंवला आणि शाहजहानपूर येथे आयोजित केलेल्या विशाल विजय संकल्प शंखनाद महासभांमध्ये बोलताना पंतप्रधान मोदी यांनी उत्तर प्रदेशातील जनतेला सपा आणि काँग्रेसच्या वारसा कर आणि एक्स-रे योजनेची माहिती दिली. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री श्री. योगी आदित्यनाथ, उत्तर प्रदेश भाजप प्रदेशाध्यक्ष श्री. भूपेंद्र चौधरी, केंद्रीय राज्यमंत्री आणि आग्रा लोकसभा उमेदवार श्री. एस.पी. सिंह बघेल, फतेहपूर सिक्री लोकसभा उमेदवार श्री. राजकुमार चहर, आंवला लोकसभा उमेदवार श्री. धर्मेंद्र कश्यप आणि राज्य सरकारमधील मंत्री श्रीमती बेबी रानी मौर्य यांच्यासहइतर पदाधिकारी याप्रसंगी मंचावर उपस्थित होते.

भाजपचे संकल्प पत्र देश मजबूत करण्याच्या संकल्पाशी समर्पित असून पाया जितका मजबूत तितके घर मजबूत, या विचाराने भाजप गरीब, शेतकरी, तरुण आणि महिला शक्ती यांना विकसित भारतासाठी सक्षम करत आहे, असे ते म्हणाले. भारतात धर्माच्या आधारावर आरक्षण कधीच दिले जाणार नाही हे स्वातंत्र्य मिळाल्यापासूनच स्पष्ट झाले होते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या इच्छेनुसार संविधानाचा आणि सामाजिक न्यायाचा तो गाभा आहे. पण काँग्रेस हा असा पक्ष आहे, जो बाबासाहेबांचा, संविधानाचा आणि सामाजिक न्यायाचा अपमान करत आहे. काँग्रेसने कधी कर्नाटकात, कधी आंध्र प्रदेशात आणि कधी आपल्या जाहीरनाम्यात अनेक वेळा धर्माच्या आधारावर आरक्षणाचा पुरस्कार केला आहे. देशाच्या संविधानाने आणि देशाच्या न्यायालयांनी काँग्रेसला हे करण्यापासून वारंवार मनाई केली आहे. देशाच्या न्यायव्यवस्थेने नेहमीच काँग्रेसची प्रत्येक गोष्ट फेटाळून लावली, त्यामुळे काँग्रेसने आता मागच्या दाराने एक खेळ खेळायला सुरुवात केली आहे, ज्यातून एससी, एसटी आणि ओबीसींच्या डोळ्यात धूळफेक करण्याच प्रयत्न केला जात आहे. काँग्रेसने आता धर्माच्या आधारावर आरक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी काँग्रेसने ओबीसींच्या २७ टक्के आरक्षणातील काही हिस्सा हिसकावून धर्माच्या आधारे आरक्षण देण्याची योजना आखली आहे. कर्नाटकच्या काँग्रेस सरकारने रातोरात कागदावर शिक्का मारून राज्यातील मुस्लिम समाजाला ओबीसी बनवून २७ टक्के आरक्षणात समाविष्ट केले. काँग्रेसने ओबीसी वर्गाच्या हक्कांवर डल्ला मारला आहे. तोच खेळ यूपीमध्ये खेळण्याचा काँग्रेसचा मानस असून यावेळी त्यांना समाजवादी पक्षाचा पूर्ण पाठिंबा मिळत आहे. २०१२ मध्ये, उत्तर प्रदेश विधानसभेच्या आधी, काँग्रेसप्रणित यूपीए सरकारने असाच प्रयत्न केला होता. काँग्रेसने धर्माच्या आधारावर अल्पसंख्याकांना ओबीसी आरक्षणाचा एक भाग देण्याचा निर्णय घेतला होता, परंतु नंतर त्यांच्या हेतूत यशस्वी झाले नाहीत. काँग्रेस आणि सपाची ही घातक खेळी उत्तर प्रदेशातील जनतेला आणि ओबीसी समाजाला समजून घ्यावी लागेल. भारतीय राज्यघटनेनुसार उत्तर प्रदेशातील अनेक ओबीसी जातींना आरक्षणाचा अधिकार आहे, पण काँग्रेस आणि सपा त्यांच्याकडून हा अधिकार हिसकावून त्यांच्या आवडत्या व्होट बँकेला द्यायचा आहे. आपल्या व्होटबँकेसाठी सपा यादव आणि मागासवर्गीयांचा सर्वात मोठा विश्वासघात करत आहे. तुष्टीकरणात बुडलेल्या समाजवादी पक्ष आणि काँग्रेस या दोघांची विचारसरणी सारखीच आहे. उत्तर प्रदेशातील काँग्रेस आणि सपाच्या दोन मुलांमधील मैत्रीचा आधारही तुष्टीकरणाचे राजकारण आहे. ही दोन्ही मुलं आपल्या भाषणात ओबीसी-ओबीसी करतात, पण मागच्या दाराने ओबीसींचे हक्क हिसकावून त्यांची व्होट बँक मजबूत करण्याचे काम करतात, अशी टीका पंतप्रधानांनी केली. काँग्रेस पक्षाचे एक वैशिष्ट्य असे आहे की, जेव्हा त्यांना कोणतेही मोठे दुष्कृत्य करावे लागते, तेव्हा ते देशाच्या आणि संविधानाच्या नावाने आवाज उठवू लागतात. ७० च्या दशकात काँग्रेसने अशाच प्रकारच्या घोषणा देत देशात आणीबाणी लागू केली होती. आज पुन्हा एकदा काँग्रेसने फ्लॉप चित्रपट प्रदर्शित केला आहे, अशा शब्दांत त्यांनी काँग्रेसची खिल्ली उडविली.

पूर्वी भ्रष्ट लोक तुमचा पैसा लुटायचे. पण आता काँग्रेस आणि इंडी आघाडीचा नवा प्लॅन समोर आला आहे. यात आहे काँग्रेसची लूट, जी आयुष्यासोबतही आणि आयुष्यानंतरही केली जाणार आहे. देशातील जनतेच्या मालमत्तेची चौकशी होणार असल्याचे काँग्रेसचे नेते उघडपणे सांगत आहेत. काँग्रेसच्या राजपुत्राचे एक्स-रे मशीन आता महिलांच्या कपाटात आणि लॉकरमध्ये जाऊन त्यांच्याकडून स्त्रीधन आणि मंगळसूत्रावर डल्ला मारणार आहे, या आरोपाचाही मोदी यांनी पुनरुच्चार केला. देशाच्या माता-भगिनी आपले स्त्रीधन कधीही कुणाला देणार नाहीत, हे इंडी आघाडीच्या नेत्यांना माहीत नाही. काँग्रेस-सपा यांच्या इंडी आघाडीची नजर लोकांच्या वारशावर आहे. वडिलार्जित संपत्तीपैकी निम्म्याहून अधिक मालमत्ता ताब्यात घेण्याचा काँग्रेसचा इरादा आहे. जनतेने गोळा केलेल्या संपत्तीवर निम्म्याहून अधिक कर लादून ती भावी पिढ्यांसाठी काँग्रेसला लुटायची आहे,असेही मोदी म्हणाले. केवळ आर्थिकच नव्हे, तर संस्थांच्या कार्यालयांचे सर्वेक्षण करण्याचा काँग्रेसचा मानस आहे. म्हणजे एका मागास-दलित कुटुंबात दोन माणसे नोकरी करत असतील, तर एक नोकरी हिसकावून ज्यांचा देशाच्या साधन संपत्तीवर पहिला हक्क आहे, त्यांना ती देण्याचा डाव आहे, पण जोपर्यंत मोदी जिवंत आहेत, तोपर्यंत देशात असा अन्याय होऊ देणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. एससी, एसटी आणि ओबीसींचे हक्क आणि महिलांचे स्त्रीधन आणि मंगळसूत्र पाहण्याआधी इंडी आघाडीला मोदींशी सामना करावा लागेल. भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई केली जाईल आणि लुटलेला पैसा गरिबांना परत दिला जाईल, असा भाजपचा संकल्प आहे. भ्रष्टाचाऱ्यांकडून जप्त केलेला पैसा, बंगले आणि गाड्या जनतेत कशा वाटायच्या यावर मोदी वेगाने काम करत आहेत. इंडी आघाडीचे नेते माता-भगिनींच्या स्त्रीधनावर लक्ष ठेवून आहेत, पण माता-भगिनींना मालमत्तेचे हक्कदार बनवण्यासाठी मोदी चौकीदार म्हणून उभे आहेत. येत्या ५ वर्षात देशातील स्त्री शक्तीचे जीवन अधिक सशक्त होणार आहे, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## महाराष्ट्र दिनी चंद्रपूरवासियांसाठी सांस्कृतिक मेजवानी

# अवंती - अंबर सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने सुमधुर गीतांच्या स्वरांजली कार्यक्रमाचे आयोजन







**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र दिनानिमित्य चंद्रपूर जिल्हा वासियांसाठी सांस्कृतिक मेजवानीचे आयोजन अवंती - अंबर सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने १ मे २०२४ रोजी सायंकाळी ६ ते १० वाजेपर्यंत चांदा क्लब ग्राउंडवर सुमधुर गीतांच्या स्वरांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आहे .

महाराष्ट्र दिनानिमित्य अवंती - अंबर सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने चंद्रपूर जिल्हा वासियांसाठी आनंदाची मेजवानी आयोजित करण्यात अली असून

सुर नवा ध्यास नवा, सा रे ग म प झी मराठी फेम, ५७ व्या महाराष्ट्र राज्यात चित्रपट पुरस्कार विजेती , सुप्रसिद्ध पार्श्वगायिका मधुरा कुंभार, सारेगमप, इंडियन आयडल, सुर नवा ध्यास नवा फेम प्लेबॅक सिंगर प्रसेनजीत कोसंबी , द केरला स्टोरी प्लेबॅक सिंगर, सुर नवा ध्यास नवा उपविजेती सारेगमप फेम अंशिका चोणकर, यांच्या उपस्थित सुमधुर गीतांच्या स्वरांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

मोठ्या संख्येने सदर स्वरांजली कार्यक्रमाचा चंद्रपूरप्रेमींनी घ्यावा असे आवाहन मुख्य आयोजक अवंती - अंबर सामाजिक प्रतिष्ठानचे महेश मेंढे यांनी केले आहे.


# रेतीचे अवैध उत्खनन, १० जणांवर गुन्हा दाखल;३५.३८ लाखाचा मुद्देमाल जप्त



**वरोरा । प्रतिनिधी**

रेती घाटाचे लिलाव झाले नसतानाही वरोरा तालुक्यातून वाहणाऱ्या वर्धा नदी पात्रातील तुळाणा व करंजी घाटातून रेतीचे अवैधरित्या उत्खनन करणाऱ्या १० जणांविरूध्द पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई शुक्रवार, २६ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजताच्या सुमारास करण्यात आली. या कारवाईत ३५ लाख ३८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. येथील सहायक पोलिस अधीक्षक व उपविभागीय पोलिस अधिकारी नयोमी साटम यांनी वरोरा पोलिस पथकासह वर्धा नदीच्या करंजी व तुळाणा घाटावर धाड टाकली. त्यावेळी रेतीचे अवैध उत्खनन करणारे ५ ट्रॅक्टर व रेती भरलेल्या ट्रॉली, ३ भ्रमणध्वनी असा एकूण ३५ लाख ३८ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणात आरोपी ट्रॅक्टर चालक आणि मालक नितेश वामन पिंगे, मुकेश चांदेकर, विजय आनंद मारेकर, राजा थैम, विकास जानकीराम पंधरे, आसिफ थैम, भालचंद्र महादेव पिंपळशेंडे, राजु गंधारे, संजय मारोती खांडेकर आणि विक्की गंधारे यांच्याविरूध्द कलम ३७९, अ ३४ भादंवि, सहकलम ४८ महाराष्ट्र महसुल अधिनियमानुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही कारवाई सहायक पोलिस निरीक्षक विनोदजांभुळे , किशोर बोढे, दिपक मोडक, विशाल राजुरकर, विठ्ठल काकडे आदींनी केली.

**बाळापूर तळोधी रस्त्यावर गुलमोहरच्या झाडाला फुलं लागल्यामुळे आकर्षित दिसत असुन बघणाऱ्यांचे मन प्रसन्न होत आहे. छाया :प्रणय बांगरे.**



# शंकरपूर येथे भागवत सप्ताह प्रित्यर्थ गोपाल काला व भव्य शोभायात्रेचे आयोजन

**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर तालुक्यातील शंकरपुर या १२ हजार लोक वस्तीच्या गावात वृंदावन धाम हनुमान मंदिर किल्ला येथे दिनांक २१ एप्रिल पासून ते २७ एप्रिल पर्यंत भागवत सप्ताह व त्या पित्यर्थ गोपाल काल्याचे आणि भव्य शोभायात्रेचे आयोजन दरवर्षीप्रमाणे याही वर्षी करण्यात आले. गेल्या ४५ वर्षापासून ही भागवत सप्ताहाची परंपरा शंकरपूर येथे सुरू आहे.

या कार्यक्रमाप्रसंगी प्रत्येक दिवशी भारुड, कीर्तन, भजन व विविध कार्यक्रमाद्वारे गावातील तसेच परिसरातील नागरिकांचे प्रबोधन केल्या गेले. या कार्यक्रमा मधून लोकांमध्ये जनजागृती केल्या जात असून परिसरातील तसेच गावातील हजारो भावीक भक्त याचा लाभ घेतला. तसेच या कार्यक्रमा प्रित्यर्थ दिनांक २६ एप्रिल ला सायंकाळी सहा वाजता भव्य शोभा यात्रेचे आयोजन गावातील स्वप्नपूर्ती शोभा यात्रा मंडळ.,व्यापारी मंडळ, तरुण पर्यावरणवादी मंडळ, पत्रकार संघ शंकरपूर, गावातील सर्वच महिला मंडळ, व नागरिक यांच्या सहकार्याने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी केल्या गेले.

या शोभा यात्रेमध्ये विविध प्रकारच्या धार्मिक तसेच सांस्कृतिक झाकी प्रदर्शित केल्या गेल्या. त्यामुळे गावात आनंदाचे उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. ही शोभायात्रा गावातील मुख्य मार्गाने निघाली असता या शोभायात्रे दरम्यान ठीक ठिकाणी गावातील मंडळातर्फे तसेच प्रतिष्ठित नागरिकांतर्फे शरबत वाटप, मठ्ठा वाटप, आलूभात वाटप इत्यादी सेवा पुरविली गेली.

तसेच २७ एप्रिल ला दुपारी दोन वाजता गोपाल काल्याचे आयोजन केलेले असून, या



कार्यक्रमात सामूहिक विवाह सोहळ्याचे ही आयोजन केल्या गेले. या सामूहिक विवाह सोहळ्यात हजारो भाविक भक्तांच्या साक्षीने दोन जोडप्यांचे लग्नकार्य पार पडले. दुपारी एक वाजता ह. भ. प. भागवताचार्य प्रदीप महाराज टाले महाराज यांचा कीर्तनाचा कार्यक्रम व त्यानंतर गोपाल काल्याचा कार्यक्रम संपन्न झाला. नंतर दुपारी चार वाजता हजारो भाविक भक्तांसाठी महाप्रसादाचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाला शंकरपूर तसेच परिसरातील गावामधील भाविक भक्त पुरुष महिला तसेच बालगोपाल हजारोंच्या संख्येने उपस्थित होते.

## उद्धव ठाकरे यांची जिल्हाप्रमुखांना शाब्बासकीची थाप...!

# पक्ष प्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांना लोकसभा आढावा व कार्यअहवाल जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांनी केला सादर





**वरोरा । प्रतिनिधी**

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे विदर्भ दौऱ्यावर असताना चंद्रपूर जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांनी भेट घेऊन चंद्रपूर लोकसभा निवडणुकीचा आढावा तसेच दोन वर्षातील पक्षसंघटनेचा कार्यअहवाल सादर केला.


महाराष्ट्रात सगळीकडे लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. अशातच पहिल्या टप्प्यामध्ये चंद्रपूर लोकसभेची निवडणूक संपन्न झाली आहे. विदर्भातील लोकसभा निवडणुकीचा तसेच प्रचार दौऱ्यानिमित्त आलेले शिवसेना (उबाठा) गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांनी भेट घेऊन नुकत्याच पहिल्या टप्प्यामध्ये संपन्न झालेल्या चंद्रपूर लोकसभा निवडणुकीचा आढावा तसेच दोन वर्षातील पक्षसंघटनेचा कार्यअहवाल जिल्हासंपर्क प्रमुख प्रशांत कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत सादर केला. याप्रसंगी उद्धव ठाकरे यांनी जिल्हाप्रमुखांच्या कार्याची स्तुती करत शाब्बासकीची थाप दिली. तसेच आगामी विधानसभा, जिल्हा परिषद,पंचायत समिती, नगर परिषद निवडणुकीत भगवा फडकावण्यासाठी कामाला लागा असा आदेश दिला. यावेळी उपजिल्हा प्रमुख अमित निब्रड,जेष्ठ शिवसैनिक तथा शिवदुत बंडू डाखरे, युवासेना जिल्हा समन्वयक तथा माजी नगरसेवक दिनेश यादव, युवासेना विधानसभा समन्वयक निखिल मांडवकर, विधानसभा सोशल मीडिया प्रमुख गणेश चीडे, सोहेल अली व आदी शिवसैनिक उपस्थित होते.

# गाडी सावकाश चालवू: गावी सुखरूप पोहचू!

**कारण हम भी किसीसे कम नही! हाच त्याचा स्वाभिमानी हेका असतो, तोरा असतो. परंतु त्याला हे कळत नाही, कि जाऊ दे बिचाऱ्याला! तो अंत्यत तातडीच्या कामात असेल. त्या ओव्हर टेकरची गाडी अधिक बलशाही व नवीन, कोरी करकरीत असेल. जाऊया आपण आपल्या नित्य चालीने. ओव्हर टेकरला मात्र ही सवय नित्याचीच होऊन जडलेली असते. कुठल्याच कामात तो मागे राहू इच्छित नाही. यातून त्यास खुप मोठा आनंद मिळत असावा, मात्र तो क्षणिक आणि आसुरी आनंद असतो. तो शाश्वत आनंद, ब्रह्मानंद मुळीच नसतो, हे मात्र नक्की! असेही त्याला वाटते, की आपण फार मोठे पराक्रमी वीर आहोत, म्हणून सदैव सैनिका पुढेच जायचे! या तोऱ्यात तो मिरवत फिरतो. ही मार्गदर्शक जाणिव जागृती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींच्या शब्दातून जरूर वाचा... संपादक.**

आज प्रत्येकाच्या मुखातून हे शब्द बाहेर पडताना दिसतात, की सद्याचे युग हे स्पर्धेचे युग आहे. म्हणूनच की काय? आजचा युवकवर्ग पुढच्यास ओलांडून त्याच्या कितीतरी पुढे निघून जाण्याच्या नादात- ओव्हर टेक करण्याच्या प्रयत्नात सदासर्वकाळ दिसून येतो. यातच तो आनंद मानतो, हेच आपले ध्येय समजतो. मग तो जीवनमार्ग असू द्या किंवा वर्दळीचा राष्ट्रीयमार्ग तथा आंतरराष्ट्रीय महामार्ग असू द्या. आपलाच एक बांधव आहे, आपल्यासारखाच एक मानव आहे, अशी कदाचित त्याला कल्पना किंवा बुद्धीच उमगत नसावी. असे ते ओव्हर टेकचे भयान नाट्य बघून वाटते. बरं, एकाने ओव्हर टेक केले, म्हणून दुसरा तरी शांत व आपल्या चालीने- वेगाने मार्गक्रमण असतो का? नाही. त्याला पण चेव येतो, त्याची तीव्रपणे चेतना जागृत होते. मग तो चिडून त्वेषाने इरेस पेटतो आणि आपणही त्याला मागे पाडावे, म्हणून तो गाडी अतिवेगान दामटू लागतो. कारण हम भी किसीसे कम नही! हाच त्याचा स्वाभिमानी हेका असतो, तोरा असतो. परंतु त्याला हे कळत नाही, कि जाऊ दे बिचाऱ्याला! तो अंत्यत तातडीच्या कामात असेल. त्या ओव्हर टेकरची गाडी अधिक बलशाही व नवीन, कोरी करकरीत असेल. जाऊया आपण आपल्या नित्य चालीने. ओव्हर टेकरला मात्र ही सवय नित्याचीच होऊन जडलेली असते. कुठल्याच कामात तो मागे राहू इच्छित नाही. यातून त्यास खुप मोठा आनंद मिळत असावा, मात्र तो क्षणिक आणि आसुरी आनंद असतो. तो शाश्वत आनंद, ब्रह्मानंद मुळीच नसतो, हे मात्र नक्की! असेही त्याला वाटते, की आपण फार मोठे पराक्रमी वीर आहोत, म्हणून सदैव सैनिका पुढेच जायचे! या तोऱ्यात तो मिरवत फिरतो. किंवा नुसतीच त्याला मिरवायचे असते की आपण किती कार्यतत्पर आहोत. आपली कामाची उरक लोकांच्या डोळ्यांत त्वरेने भरण्याची घाई त्याला झालेली असते. जशी आपल्याकडे झाडीबोलीतील एक म्हण प्रसिद्ध आहे तशी-

येलपाडीचे (मिजासखोर स्त्रीचे) आले डोळे।
खाटले ठेवून खाल्या लोळे।।



संकलन व सुलेखन
श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.
पोटेगावरोड, गडचिरोली,
फक्त मधुभाष- ७१३२७९६६८३.

ज्ञानवंतांनी भुकेल्या, तहानलेल्या, अधाशी, हपापलेल्या व्यक्तीस पुढ्यात घेऊन त्याची इच्छा पूर्ण केली पाहिजे. त्याच्यासारखेच ज्ञानवंतही करू लागले तर त्यांच्यातील फरकच कळणार नाही. म्हणून ज्ञानवंतांनी संयम, सबुरी व धीरानेच अशा प्रसंगाना सामोरे जाणे इष्ट ठरते. एकदा एका बाइकस्वाराने ओव्हर टेक केला. तेव्हा मागे पडलेला बाइकस्वार त्वेषाने पेटून उठला व बाइक वेगात दामटली. अतिवेगामुळे वळणावर ती घसरली आणि रस्त्याच्या कडेला असलेल्या दगडावर जोरात आपटली. तिचा चेंदामेंदा झाला, तर बाइकस्वाराने मात्र या जगाचा कायमचा निरोप घेतला. दुसरी एक घटना अशी, की चार चाकी कारला एका बाइकस्वार युवकाने ओव्हर टेक करून मागे टाकले आणि तो शहरातील मुख्य चौकात येऊन काहीतरी खरेदी करू लागला. तेवढ्यात ती कार येऊन पोहोचली. कारचालक युवती त्याला आडवी झाली. मला ओव्हर टेक करण्याची तुझी हिंमतच कशी झाली? म्हणत आधी त्याच्या गालांगालावर मोजले आणि मग त्याला चांगलेच बदडून काढले. असा आपल्याला ओव्हर टेक केल्याचा वचपा, बदला घेतला. किती मोठ्ठा आनंद, परमानंद झाला असेल तिला! नाही काहो? तरीही बिचारा युवक शांतच! अशा या भानगडी विनाकारण जीवावर बेतत असतात. तरीही ओव्हर टेकर्सना यात काहीच कशी लाज-शरम वाटत नाही? ईश्वरप्राती करून ब्रह्मानंद प्राप्तीसाठी अशी तातडी, असे साधकांना ओव्हर टेक करणारे महाभाग मात्र क्वचितच दृष्टीस पडतात. कारण या आध्यात्मिक, भक्तिमार्गावर चालणारा लंगडालुळा होत नाही तर त्याचा थेट पुनर्जन्मच होतो, एक खरा भला माणूस म्हणूनच!

समजा, आपली एखादी मूल्यवान वस्तू घरातच कुठेतरी हरवली. ती जोपर्यंत आपल्या दृष्टीस पडत नाही तोपर्यंत मनास चैन पडेल तर शप्पथ! ती शोधण्यासाठी आपण एका पाठोपाठ एक साधन वापरतो. कधी काठीने, कधी झाडूने ओढून, ढकलून वा चाचपडून बघतो. तर कधी विजेरीचा प्रकाशझोत टाकून डोळे फाडफाडून पाहतो. ती वस्तू सांपडत नाही, तोवर शोध घेणे आपण थांबवित नाही. सहज एखादे सद्गृहस्थ यावे आणि वस्तू उचलून तुम्ही शोधत आहात ते हेच का? असे उच्चारताच आपली उत्सुकता शिगेला पोहोचते. झटकन ती वस्तू हातात घेऊन तिला निरखून बघतो आणि मोठ्या आनंदाने खड्या आवाज म्हणतो, अहो, ती हीच माझी अमोलक वस्तू! मी हीलाच शोधत होतो. असे म्हणून आपण पूर्वीप्रमाणे ती वस्तू शोधत राहाल का? नाही. आधी त्या दात्या व्यक्तीस अनेक नमस्कार घालतो, धन्यवाद देऊन त्याचे स्तुतीपाठ गातो. आजीवन ऋणी व उपकृत राहण्याचे बोलून दाखवितो व वचनबद्ध होतो. आपण परत त्याच वस्तूचा शोध सुरूच ठेवला, तर लोक आपल्याला नक्कीच मूर्ख ठरवतील. मात्र त्या वस्तूची स्वच्छता, सुरक्षा, सुशोभन, कलाकुसर, काळजी आदी वेळोंवेळी चालवित असतो. अगदी असेच ब्रह्मानंद व इश्वरप्राप्तीस केल्या जाणाऱ्या भक्ती वा पुजापाठाचे आहे. विचारा, कसे? तर आपण पुजापाठ कशासाठी करतो? त्यामागील उद्देश साफ-स्पष्ट असावा लागतो. ईश्वरप्राप्ती करून ब्रह्मानंद मिळवावे, असा उद्देश असेल तर वरील दृष्टांत तंतोतंत लागू पडतो. त्यासाठीच आपण पुजापाठ, जप, तप, योगयाग करत असतो. परंतु अनेक शोध शोधांती एखादा ब्रह्मवेत्ता सद्गुरू मिळाला आणि त्याने ब्रह्मदर्शन घडवून दिले. तर मग परत तसलेच पुजापाठ करत बसणे योग्य राहील का? नाही ना! म्हणून मग केवळ ईश्वरास आमरण प्रसन्न ठेवण्यासाठी सद्गुरूच्या आदेश व वचनांचे पालन करत त्यालाच आपण सदैव हसतमुख ठेवण्याचा प्रयत्न करतो. हे सर्वश्रूत आहे, हीच खऱ्या ब्रह्मानंदप्राप्त साधकांची परंपरा आहे. आपण जिथून सुरूवात केली होती, तिथे थांबून सांगावेसे वाटते, की ओव्हर टेक करणारास पुढे जाऊ द्या, पण मागे पडणाराने अजिबात चालाखी करू नये. पुढे जाणारास पुढ्यात घेऊन त्याच्या यशस्वीतेबद्दल सहकार्य द्यावे, यामुळे काय होईल? तर वाईट प्रसंग वा अप्रिय घटना अजिबात उद्भवणार नाही. वादंग वा हिंसाचाराला आपणच ब्रेक लावू शकाल, एवढे मात्र निश्चित! यात तुम्हाला जो आनंद मिळेल; तो खरोखरच ब्रह्मानंद असेल..!

# सत्ता असताना तीन वेळा उमेदवार का बदलला; प्रणिती शिंदेंचा भाजपला सवाल

**मंगळवेढा :** सकाळ वृत्तसेवा केद्रांत राज्यात सलग दहा वर्षे सत्ता असूनही सोलापूर लोकसभेचा उमेदवार दर निवडणुकीला का बदलावा लागतो असा सवाल उमेदवार काँग्रेसचे उमेदवार आमदार प्रणिती शिंदे यांनी तालुक्यातील मरवडे येथे बोलताना व्यक्त केला.लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमी प्रचाराच्या निमित्ताने त्यांनी आज बोराळे मरवडे हुलजंती गावाच्या दौऱ्यात मरवडे येथे त्या बोलत होत्या. शिंदे म्हणाल्या की देशातील अर्थकारण हे शेतकऱ्यांच्या जीवावर असून शेतीप्रधान देशातील शेतकऱ्यांचे अस्तित्व संपण्याची काम सत्ताधाऱ्याकडून सुरू आहे, त्यानी महागाई वाढवली, दुधाचा प्रश्न मार्गी लावला नाही, पीक विम्याचे पैसे दिले नाहीत, गुजरातचा कांदा परदेशात पाठवत महाराष्ट्राच्या कांद्याला निर्यात बंदी का? असा सवाल करून अंबानी अदानीसह पाच ठेकेदाराचे हित



पाहण्याचे काम सुरू आहे.पुढील दहा वर्षात काय काम करणार यावर न बोलता जात, धर्म, पात, हे मुद्दे काढून निवडणुकीला वेगळी दिशा देण्याचा प्रयत्न सुरू आहे तुम्ही मतदारानी या निवडणुकीची एक लढाई माझ्यासाठी करावी पुढची लढाई मी तुमच्यासाठी लढेन असे सांगून मला संधी मिळाल्यास लोकसभेत पहिला आवाज हा शेतकऱ्याचा असेल.पांडूरंग चौगुले म्हणाले की, भारताच्या स्वातंत्र्याची दुसरी लढाई सुरू झाली.निवडणूकीच्या तोंडावर मंगळवेढा उपसा सिंचन योजना माण नदीवरील बॅरेज वगळून पाणी मंजुरी गाजर दाखवले. चंद्रशेखर कौडूभैरी म्हणाले,दहा वर्षात दोन खासदारांनी लोकसभेत एकही प्रश्न मारून तडीस नेला नाही. यंदाच्या निवडणुकीत चांगला लोकप्रतिनिधी लोकसभेत जाणे आवश्यक आहे.यावेळी कार्याध्यक्ष ॲड नंदकुमार पवार, रतनचंद शहा बॅकेचे अध्यक्ष राहुल शहा, दिलीप जाधव, फिरोज मुलाणी, चंद्रशेखर कौडूभैरी, तालुकाध्यक्ष प्रशांत साळे, प्रा.येताळा भगत, प्रथमेश पाटील, हणमंत दुधाळ, साहेबराव पवार, पांडुरंग चौगुले, पांडुरंग जावळे, दौलत माने, दादा पवार, साहेबराव पवार, पै.दामोदर घुले, मनोज माळी रविकरण कोळेकर, राजाराम जगताप, तुकाराम भोजने, अजय अदाटे पांडुरंग निराळे बापू अवघडे नाथा ऐवळे सुनीता अवघडे आदीसह काँग्रेस पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

# मोदींच्या सोलापुरातील सभेसाठी भाजपची जय्यत तयारी! मोहोळमधून जाणार सुमारे वीस हजार कार्यकर्ते

**मोहोळ :** देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या २९ तारखेला सोलापूर येथे होणाऱ्या जाहीर सभेसाठी मोहोळ विधानसभा मतदार संघातून सुमारे वीस हजार कार्यकर्ते जाणार असल्याची माहिती मोहोळचे माजी आमदार राजन पाटील व भारतीय जनता पार्टीचे विधानसभा निवडणूक प्रमुख रमेश माने यांनी दिली.

सध्या सोलापूर लोकसभेच्या निवडणुकीत मोठी चुरस निर्माण झाली आहे. माळशिरसचे आमदार राम सातपुते यांच्या विरोधात सोलापूरच्या आमदार प्रणिती शिंदे अशी लढत होत आहे. आमदार सातपुते यांना निवडून आणण्यासाठी महायुतीत सामील असलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे (उपमुख्यमंत्री अजित पवार गट) माजी आमदार राजन पाटील, आमदार यशवंत माने लोकनेते कारखान्याचे अध्यक्ष विक्रांत पाटील, सिनेट सदस्य अजिंक्यराणा पाटील यांच्यासह भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष सुशील क्षीरसागर, सतीश काळे, अनुसूचित जाती जमाती मोर्चाचे



जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर भोसले यांच्यासह अन्य कार्यकर्ते व पदाधिकारी प्रचारात सक्रिय झाले आहेत.मुख्यमंत्री शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख चरणराज चवरे यांनीही पंतप्रधान मोदींच्या सभेसाठी कार्यकर्ते सज्ज केले आहेत. दरम्यान सोलापूरच्या सभेत पंतप्रधान मोदी काय बोलणार याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. लोकसभेचे महायुतीचे उमेदवार राम सातपुते यांच्या प्रचाराच्या दोन फेऱ्या पूर्ण झाल्या आहेत, आमदार सातपुते सध्या होम टु होम प्रचार करीत आहेत.

# भाजपचे मतांचा टक्का वाढवला! उज्वल निकमांना लोकसभेची उमेदवारी

**मुंबई । प्रतिनिधी**

भाजपाने १५ वी उमेदवार यादी जाहीर केली असून यामध्ये केवळ विधी तज्ञ उज्वल निकम यांचे नाव आहे.
एकीकडे मुंबईत भाजपाला उमेदवार सापडत नसल्याचे आरोप होत असताना दुसरीकडे भाजपाने विरोधकांना मुंबई उत्तर मध्य लोकसभा मतदारसंघातून विधी तज्ञ उज्वल निकम यांचे उमेदवारी साठी नाव निश्चित करून जोरदार धक्कातंत्राचा अनुभव दिला आहे.
उज्वल निकम यांची उमेदवारी जाहीर केल्याने पूनम महाजन यांची अपेक्षा आपोआप मावळली कापले गेले आहे. भाजपाने १५ वी उमेदवार यादी जाहीर केली असून यामध्ये केवळ निकम यांचाच उल्लेख आहे. दहशतवादी कसाबला फाशीची शिक्षा देणाऱ्या निकमांना भाजपाने उमेदवार घोषित



देशासाठी कायद्याची लढाई लढणाऱ्यांना सन्मानाचा संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे.
या मतदारसंघातून मविआने वेळ काढत माजी मंत्री वर्षा गायकवाड यांना उमेदवारी दिली आहे. भाजपने पूनम महाजन यांना तिकीट देण्याचे टाळले होते. काँग्रेसने उमेदवार दिल्यानंतर लगेचच दुसऱ्या दिवशी भाजपाने आपला तगडा उमेदवार जाहीर केला आहे. २०१६ मध्ये निकम यांना पद्मश्रीने सन्मानित करण्यात आले होते. सरकारी वकील म्हणून त्यांनी अनेक बहुचर्चित खटल्यांमध्ये महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. आता मुंबईतही भाजपाने मविआला कांटे की टक्कर दिली आहे आहे म्हणण्याऐवजी या मुळे काही अंशी देशातील जनतेचा भारतीय जनता पक्षाच्या बाबतीत जमेची बाजू निर्माण झाली आहे. यामुळे महाराष्ट्रातील इतर लोकसभा मतदारसंघातून टक्का मतदान निश्चित होऊ शकते.

# प्रा.डॉ.कीर्ती मुळीक यांची 'भूमी' साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी निवड

**श्रीरामपूर । प्रतिनिधी**

भूमी फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य सेवाभावी संस्थेतर्फे २०२१ पासून महाराष्ट्र व कामगार दिनाच्या निमित्ताने ०१ मे रोजी होणाऱ्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी पुणे येथील प्रा.डॉ. कीर्ती ताई मिलिंद मुळीक/ यादव यांची निवड झाली आहे. अशी माहिती संस्थेचे संस्थापक, अध्यक्ष प्रा. कैलास पवार यांनी दिली.

२००१ साली श्रीरामपूर येथील ज्येष्ठ साहित्यिक डॉ. बाबुराव उपाध्ये,२०२२ साली पुणे येथील ज्येष्ठ गझलकार प्रा. तुकाराम पाटील तर २०२३ च्या साहित्य संमेलन अध्यक्षपद सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाच्या मा.अध्यक्षा, ज्येष्ठ साहित्यिका, प्रकाशिका डॉ. स्नेहल तावरे यांनी भूषविले. २०२४ सालच्या भूमी फौंडेशन आयोजित



साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष म्हणून पुणे येथील एस पी. कॉलेजमध्ये मराठी विभाग प्रमुख आहेत. ग्रामीण साहित्य चळवळीचे अध्वर्यू डॉ. आनंद यादव यांच्या त्या सुकन्या आहेत. त्यांची कथा, कविता, समीक्षा अशा विविध प्रकारात अनेक पुस्तके १५ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. ' आनंद यादव: एक साहित्यिक प्रवास' या गौरव ग्रंथास आदर्श शिक्षिक क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार, कोपरगाव येथील भि. ग. रोहमारे पुरस्कार, श्रीरामपूर येथील विजयानंद सरगम वाचक ग्रुपचा स्व. विजया कु -हे साहित्य पुरस्कार, वाचन संस्कृती प्रतिष्ठान प्रेरणा पुरस्कार, आपटे वाचन मंदिर इचलकरंजी पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले आहे नुकताच त्यांच्या' वर्तमान' कथासंग्रहास महाराष्ट्र शासनाचा स्व. पशवंतराव चव्हाण उत्कृष्ठ वाङमय पुरस्कार मिळाला साहित्य विश्वातील प्रतिष्ठित चार पुरस्कार लाभलेल्या त्यांच्या या कथा संग्रहाची मोठी चर्चा आहे. साहित्यिक भगिनी मंडळं, आकाशवाणी कार्यक्रममात त्या सहभागी आहेत. त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# ७ कामचुकार कंत्राटदार काळ्या यादीत

## आणखी काहींवर होणार कारवाई;जलजीवन मिशनच्या कामात हयगय;मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचा इशारा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

केंद्र सरकारचा महत्त्वाचा प्रकल्प असलेल्या जलजीवन मिशनची अनेक कामे ढिम्म गतीने सुरू आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन यांनी जलजीवन मिशनच्या कंत्राटदारांची बैठक घेऊन कामचुकार कंत्राटदारांना तंबी दिली आणि ७ कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकले. कामे वेळेत पूर्ण न केल्यास आणखी काहींना काळ्या यादीत टाकण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.
जलजीवन मिशनची २०२०-२१ या वर्षात सुरुवात झाली. योजनेअंतर्गत जिल्ह्यात १ हजार ३०० कामांची निवड करण्यात आली. कामांची निवड करण्यात आल्यानंतर निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. जिल्ह्यासह अन्य जिल्ह्यांतील कंत्राटदार यात सहभागी झाले होते. अनेक कामे असल्याने मोठी स्पर्धा कंत्राटदारात होती. अटी, शर्तीची पूर्तता करणाऱ्या कंत्राटदारांना कामे मिळाली. जलजीवन मिशनची कामे ३१ मार्च २०२४ पर्यंत करायची होती. त्यामुळे वेळेत कामे पूर्ण करण्याबाबत वेळोवेळी निर्देश देण्यात आले. त्यानंतरही अनेक कामात फारशी प्रगती दिसून येत नसल्याचे चित्र आहे. मधल्या काळात कामात हयगय करणाऱ्या कंत्राटदारांना नोटीस देण्यात आल्या. त्यांची सुनावणी घेण्यात आली. त्यानंतरही त्यांच्या कामात सुधारणा झाली नाही. त्यामुळे अनेक कंत्राटदारांना दंड ठोठावण्यात आला. त्याचाही परिणाम होत नसल्याने कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकण्यात आले.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जलजीवन मिशनचा आढावा घेतला. या बैठकीला जलजीवन मिशनचे काम करणाऱ्या कंत्राटदारांना बोलविण्यात आले होते. जवळपास ५० टक्केच काम झाले आहे. त्यांनी कामाचा वेग न वाढविल्यास त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. त्यानंतरही कामात सुधारणा न झाल्यास काळ्या यादीत टाकण्यात येणार असल्याची तंबी त्यांनी दिली.यापूर्वी कामात हयगयपणा करणाऱ्या ७ कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकले. आता पुन्हा जलजीवन मिशनच्या कामात ढिसाळपणा करणाऱ्या कंत्राटदारांना दोन आठवड्याची मुदत दिली आहे. कामे वेळेत पूर्ण न झाल्यास सबंधित कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकू, अशी प्रतिक्रिया जॉन्सन यांनी दिली.



# टोमणे मारणे हा उद्धव ठाकरेंचा स्थायीभाव भाजपा गटनेते आ.प्रविण दरेकरांचे टिकास्त्र

**मुंबई । प्रतिनिधी**

उद्धव ठाकरे यांनी केलेल्या वक्तव्यांचा भाजपा विधानपरिषद गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी आज चांगलाच समाचार घेतला. उद्धव ठाकरेंना केवळ बडबड करण्यापेक्षा दुसरे काहीच येत नाही. त्यांना ना महाराष्ट्राचे प्रश्न माहित, ना त्यांनी कधी रस्त्यावर उतरून आंदोलन केले. फक्त उचलली जीभ लावली टाळ्याला एवढंच बडबड करण्याचे आणि मत्सराने, द्वेषाने टोमणे मारणे हा उद्धव ठाकरेंचा स्थायीभाव झाला असल्याची टीका दरेकरांनी केली. तसेच संजय राऊत आणि उद्धव ठाकरे एकाच नाण्याच्या बाजू असून लोकांच्या नजरेत त्यांच्या वक्तव्याला शून्य किंमत असल्याचेही दरेकर म्हणाले. पत्रकारांशी संवाद साधताना दरेकर म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार येण्यापूर्वी काँग्रेसने अनेकदा जात जनगणना करू अशी आश्वासने दिली, घोषणा केल्या. परंतु खऱ्या अर्थाने सर्व जातीधर्माला बरोबर घेऊन त्यांची प्रगती करण्याचे काम पंतप्रधान मोदींनी १० वर्षाच्या कालावधीत केले आहे. त्या जातींचा विकास सर्वार्थाने होणे गरजेचे आहे. तीच भुमिका घेऊन भाजपा आणि महायुतीचे सरकार कामं करतेय.दरेकर पुढे म्हणाले की, जयंत पाटील यांनी आरशात पाहावे. सत्तेत असताना महाराष्ट्रातील जनतेला काय दिले? शरद पवारांनी अनेक वर्ष महाराष्ट्रावर राज्य केले. तरीही आज आम्ही तेच प्रश्न, त्याच गरजा, तेच विषय घेऊन बोलतोय-भांडतोय. याचा अर्थ तुम्ही सपशेल अपयशी ठरलात. उद्धव ठाकरेंच्या अडीच वर्षाच्या काळात सर्व ठप्प होते. आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित





पवार यांच्या नेतृत्वात राज्य सरकार उत्तम काम करतेय, सर्वांगीण विकास होतोय. केंद्राच्या माध्यमातून गरिबांच्या कल्याणाच्या अनेक योजना कार्यान्वित होताहेत. जयंत पाटील यांना काय वाटते हे आमच्यासाठी महत्वाचे नाही, तर सर्वसामान्यांना काय वाटते हे आमच्यासाठी महत्वाचे आहे. दरेकर पुढे म्हणाले की, बेरोजगारांना काम देण्यासंदर्भात मोदींनी अनेक योजना आणल्या. सरकारी आणि निमसरकारी भरतीच्या माध्यमातूनही मोठ्या प्रमाणावर रोजगार मिळणार आहे. ज्यांचे सरकारच येणार नाही त्यांनी कुठल्याही घोषणा करायच्या. कंत्राटी बेरोजगारांसाठीही आमचे सरकार कटिबद्ध आहे. त्यांचा कायमस्वरूपी हिताचा विचार निश्चितच करण्यात येणार आहे. भाजपने सातत्याने मतदान जास्तीचे व्हावे यासाठी प्रयत्न केलेला आहे. मतदान कुणालाही करा पण मतदानाचा लोकशाहीने, संविधानाने, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला अधिकार बजवावा अशा प्रकारची भुमिका स्वतः पंतप्रधान मोदींसहित भाजपाची राहिली आहे. जगातील प्रगल्भ आणि मोठी लोकशाही आपली आहे. मतदान जास्त टक्के होणे हे लोकशाहीच्या सशक्ततेचे लक्षण असल्याचेही दरेकर म्हणाले. थकहमी कुणाला दिली जाते, त्याचे निकष काय आहेत त्या अर्थाने ती थकहमी त्यात्या कारखान्याला दिली जाते. पंकजा मुंडे यांनी स्वतः थकहमी नको अशी भुमिका घेतलेली मला माहित आहे. पंकजा मुंडे यांची काळजी विरोधकांना जास्त यायला लागलीय. पंकजा मुंडे यांच्यामागे ताकदीने उभे राहण्यासाठी आम्ही सक्षम आहोत. राज्य-केंद्र सरकार आहे इतरांनी काळजी करू नये. आमच्यात काडी टाकून आग लावण्याचा प्रयत्न केलात तर तो यशस्वी होणार नाही, असा टोलाही दरेकरांनी लगावला.

## ३८-शिर्डी लोकसभा मतदारसंघात शुक्रवारी, २६ एप्रिल रोजी नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यात आली

**शिर्डी । प्रतिनिधी**

३८ शिर्डी लोकसभा निवडणुकीत नामनिर्देशन अर्ज वैध ठरलेल्या उमेदवारांपैकी - भाऊसाहेब राजाराम वाकचौरे (शिवसेना - उध्दव बाळासाहेब ठाकरे), लोखंडे सदाशिव किसन (शिवसेना), चंद्रकांत संभाजी दोंदे (अपक्ष), अभिजीत अशोकराव पोटे (अपक्ष), भारत संभाजी भोसले (समता पार्टी), नितीन दादाहरी पोळ (बहुजन भारत पार्टी), बागुल गोरक्ष तान्हाजी (अपक्ष), ड. सिध्दार्थ दिपक बोधक (अपक्ष) , अशोक रामचंद्र आल्हाट (जनहित लोकशाही पार्टी), सतिष भिवा पवार (अपक्ष), संजय पोपट भालेराव (अपक्ष), रामचंद्र नामदेव जाधव (बहुजन समाज पार्टी), उत्कर्षा प्रेमानंद रूपवते (वंचित बहुजन आघाडी), गंगाधर राजाराम कदम (अपक्ष), भाऊसाहेब रामनाथ वाकचौरे (अपक्ष) , प्रशांत वसंत निकम (अपक्ष), खरात नचिकेत रघुनाथ (अपक्ष), संजय हरिश्चंद्र खामकर (बळीराजा पार्टी), राजेंद्र रत्नाकर वाघमारे (राष्ट्रीय जनक्रांती पार्टी), रविंद्र कलय्या स्वामी (अपक्ष), खाजेकर विजयकुमार गोविंदराव (अपक्ष) व सना मोहंमद अली सय्यद (अपक्ष) असे आहेत.नामनिर्देशन पत्र अर्ज अवैध/नाकारण्यात आलेले अर्जदार - राजू शिवराम खरात (बहुजन समाज पार्टी), डोळस जयाबाई राहूल (रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (-), अशोक



अनाजी वाकचौरे (अपक्ष), चंद्रहार त्र्यंबक जगताप (अपक्ष), शंकर संभाजी भारस्कर (अपक्ष), दिलीप भाऊसाहेब गायकवाड (अपक्ष), डॉ.अशोक बाजीराव म्हंकाळे (अपक्ष), संतोष तुळशीराम वैराळ (अपक्ष) व सतिष भुपाल सनदी (अपक्ष) असे आहेत.नामनिर्देशन मागे घेण्याची अंतिम तारीख २९ एप्रिल सायंकाळी ३.०० वाजेपर्यंत आहे. नामनिर्देशन अर्जात नमूद केलेल्या पक्षानुसार चिन्ह वाटप केले जाईल. त्यासह जे उमेदवार अपक्ष उभे होतील त्यांनाही स्वतंत्र चिन्ह दिले जाईल. २९ एप्रिल रोजी तीन वाजेपर्यंत निवडणूक चिन्हांचे वाटप केले जाईल.

## विखेना मिळाले श्रद्धेय भगवान गडांचे आशीर्वाद

**खरवंडी । प्रतिनिधी**

अहिल्यानगर (अहमदनगर) दक्षिण लोकसभेचे उमेदवार डॉ सुजय विखे पाटील यांनी जिल्हयातील श्रध्देय गडाच्या चरणी नतमस्तक होऊन आशीर्वाद घेतले. येथे येऊन काम करण्यासाठी मोठी उर्जा मिळते. येथील प्रेरणा घेऊन समाजासाठी काम करण्याचा संकल्प आपण केला असल्याचे त्यांनी सांगितले.

खा. सुजय विखे पाटील यांनी आपल्या मतदार संघात प्रचारात आघाडी घेतली असून गावोगावी त्यांच्या भेटी वाढल्या आहेत. गावोगावी लोकांना भेटून महायुती सरकार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्फत केलेल्या लोककल्याणकारी कामांची माहिती लोकांना देत आहेत. देशात सुरू असलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची हमी, ही सर्वसामान्य नागरिकांच्या हितासासाठी आणि देशासाठी आवश्यक असून येणाऱ्या काळात देशाला जागतिक स्तरावर नेण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे खंबीर नेतृत्व असून देश त्यांच्या हाती सुरक्षित असल्याने लोकांनी पुन्हा एकदा नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान करण्यासाठी महायुतीच्या उमेदवाराला मतदान करा असे आवाहन ते नागरिकांना करत आहेत. लोकसभा निवडणुकीच्या प्रचारार्थ डॉ. सुजय विखे



पाटील यांनी भगवान गड परिसरातील गावांना भेटी दिल्या यावेळी त्यांच्या सोबत आमदार मोनिका राजळे आणि इतर कार्यकर्ते होते. यावेळी डॉ. विखे यांनी भगवान बाबांच्या समाधीला अभिवादन करत महंत शास्त्री महाराज यांचे आशिर्वाद घेतले. तसेच गड परिसरातील ग्रामस्थांशी संवाद साधला. तर ग्रामस्थांनी देखील त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा शब्द यावेळी दिला. खरवंडी, दैत्य नांदूर, टाकळी,पाथर्डी तालुक्यातील अनेक गावातील ग्रामस्थांनी सुजय विखे पाटील यांचे वाजतगाजत भव्य स्वागत केले.यावेळी संवाद साधताना ते म्हणाले की प्रथा, परंपरे प्रमाणे मी गडावर आलो आहे, शास्त्री महाराजांनी मला आशीर्वाद दिला आहे, भगवानगडाच्या परिसराच्या विकासासाठी महायुती सरकारच्या माध्यमातून आम्ही नेहमीच कटीबद्ध राहू असा देखील विश्वास त्यांनी यावेळी ग्रामस्थांना दिला. तसेच भगवानगड हे महाराष्ट्रातील प्रमुख अध्यात्मिक केंद्र असून त्याचा पर्यटन क्षेत्र म्हणुन विकास करण्याचा मानस त्यांनी व्यक्त करत त्यासाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधा निर्माण करणार असे त्यांनी सांगितले. तसेच संत ज्ञानेश्वरांच्या मंदिराचे काम पुर्ण केले जाईल. तसेच पर्यटनाच्या माध्यमातून स्थानिकांच्या रोजगारासाठी पाऊले उचलणार असल्याचे त्यांनी सांगितले. स्थानिक आमदार मोनिकाताई राजळे यांनी सुद्धा मार्गदशन केले. मोनिकाताईंनी सांगितले की, मागील पाच वर्षात डॉ. सुजय विखे यांनी जिल्ह्याचे विविध प्रश्न प्रभावीपणे संसदेत मांडून जिल्ह्याला मोठ्या प्रमाणात निधी मिळऊन विविध विकास कामे केली आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची त्यांना साथ मिळाल्याने येणाऱ्या काळात डॉ. विखे जिल्ह्याच्या विकास अधिक जलद गतीने करतील. केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजना त्यांच्या माध्यमातून जिल्ह्यात आणल्या जातील असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. मनसेचे नेते देविदास खेडकर यांनी सुद्धा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करण्यासाठी डॉ. सुजय विखे पाटील यांना मतदान करण्याचे आवाहन केले.यावेळी पाथर्डी शेवगावमतदारसंघातीलअनेक गावातील सरपंच,उपसरपंच, आजी-माजी सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते

## नांदेड जिल्ह्यातील रामतीर्थ येथे ईव्हीएम मशीन कुऱ्हाडीने फोडल्याची घटना

**नांदेड । प्रतिनिधी**

नांदेड जिल्ह्यात सर्वत्र मतदान शांततेत सुरू असताना मात्र बिलोली तालुक्यातील रामतीर्थ येथे मात्र व्हीव्हीपॅट व इव्हीएम मशिन कुर्हाडीने फोडल्याची घटना घडली. या प्रकरणी पोलिसांनी एका आरोपीला ताब्यात घेतले आहे.

रामतीर्थ येथील ३ नंबर वार्ड येथे सकाळी ७ वाजता मतदानास सुरुवात झाली. दुपारी ४ वाजेपर्यंत ३७९ पैकी १८५ जणांनी मतदानाचा हक्क बजावला होता. मतदान सुरू असतानाच गावातील तरुण भैय्यासाहेब आनंदराव एडके (वय २५) हा कुर्हाड घेऊन थेट मतदान केंद्रात घुसला आणि त्याने कुर्हाडीने व्हीव्हीपॅट, इव्हीएम मशिन फोडण्यास सुरुवात केली. त्याने मी एम.ए. झालो असून बेरोजगार आहे, मला नोकरी मिळत नाही असे तो म्हणत होता. त्याच्या हातात कुर्हाड दिसताच मतदान केंद्रप्रमुख सुबोध थोरात आणि अन्य कर्मचारी प्रचंड घाबरले होते. मात्र पोलिसांनी तातडीने त्याला ताब्यात घेतले आहे.इव्हीएम मशिन कुर्हाडीच्या घावाने फुटली असली, तरी व्हीव्हीपॅट मशिन मात्र सुरू असल्याचे सांगण्यात आले. तसेच केंद्रप्रमुखाकडे असलेल्या मशिनमध्ये मतदानाचा पूर्ण डाटा जशास तसा असल्याने मतदान प्रक्रियेमध्ये कुठलीही अडचण आली नाही. त्यानंतर नवीन इव्हीएम व व्हीव्हीपॅट मशिन मागवून पुन्हा मतदान सुरू करण्यात आले. मतदान प्रक्रियेवर या घटनेचा कोणताही परिणाम झालेला दिसून आला नाही. या मतदान केंद्रावरील उर्वरित मतदान शांततेत पार पडले असल्याचे समजते.



**सेलू तालुक्यातील रायपूर येथे साबेराबी शेक इब्राहिम यांनी आपल्या वयाच्या ९५व्या वर्षी देशाचा राष्ट्रीय उत्सव मध्ये आपल्या कर्तव्याच निर्वाहण करीत उत्सवहाने भाग घेतला यावेळी शेख जलिल .शेख अदिल धोंडीराम गाडेकर.दिनकर गाडेकर व सचिन गाडेकर पाटील उपस्थित होते**

## प्रत्येक लोकसभा मतदार संघात सभा घेणारा पंतप्रधान पाहिला नाही-वडेट्टीवार

**नागपूर**-पंतप्रधान नरेंद्र मोदी एवढ्या सभा का घेत आहे याचे आश्चर्य वाटत आहे. भाजपच्या सर्वे किंवा आयबी इंटेलिजन्स सर्विसेसचा रिपोर्टमध्ये पराभव होणार असे आले असेल, म्हणून ते सभा घेत आहे. सत्तर वर्षात प्रत्येक लोकसभा मतदारसंघांमध्ये सहभाग घेणारे पंतप्रधान आम्ही पाहिलेच नाही, असा टोला विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी गुरुवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना हाणला.शरद पवारांनी सभेत मोदींचा व्हिडिओ दाखवला. त्यावर बोलताना फडणवीसांनी आम्ही पवारांचे जूने व्हिडिओ काढले तर त्यांनी किती कोलांटउड्या मारल्या हे कळेल असा इशारा दिला. पण, नुसता इशारा देऊन थांबू नये. तर फडणवीसांनी व्हिडिओ एकदा काढूनच टाकावे. दहा वर्षातील भाजपाचे आणि इकडचे व्हिडिओ काढा. म्हणजे दूध का दूध पानी का पानी होऊन जाऊ द्या.

# मला दिलेलं प्रत्येक मत जिल्हयाच्या विकासाला जाईल ही संधी वाया घालू नका-पंकजाताई मुंडेंनी घातली साद







**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीत विरोधकांकडे कोणताही अजेंडा नाही, त्यामुळेच ते जातीपातीचे राजकारण पुढे करत जनतेमध्ये बुद्धिभेद करण्याचे काम करत आहेत. भाजप महायुतीच्या कार्यकर्त्यांनी गावागावात जाऊन आपल्या विकासाचं व्हीजन मतदारांपर्यंत जाऊन सांगावं. तुमचं मला मिळालेलं प्रत्येक मत हे जिल्हयाच्या विकासाला जाणार आहे, त्यामुळे ही संधी वाया घालू नका. पुढील पाच वर्षे सेवा करण्यासाठी आशीर्वाद द्या असं आवाहन भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी केलं आहे.

पंकजाताई मुंडे यांनी आज मतदारसंघातील घाटनांदुर, पट्टीवडगांव, बर्दापूर, राडी सर्कलमधील गावांचा झंझावती दौरा करून मतदारांच्या प्रत्यक्ष गाठीभेटी घेतल्या तसेच महायुतीच्या कार्यकर्त्यांशी देखील संवाद साधला त्यावेळी त्या बोलत होत्या. घाटनांदुर, सायगाव, वाघाळा, हनुमंतवाडी, तळणी, हातोला, जवळगाव, पुस, तळेगाव येथे मतदारांशी गाठीभेटी घेत संवाद साधला. यावेळी भाजपचे तालुकाध्यक्ष अच्युत गंगणे, राष्ट्रवादीचे गोविंद देशमुख,बन्सी अण्णा सिरसाट, घाटनांदुरचे सरपंच महेश गारठे, वैजनाथ आप्पा गारठे, शिवाजी सिरसाट, शाम आपेट, नेताजी देशमुख, गणेश कराड, गोपाळराव दरगड, दिलीप गिते यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. भाजपा महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी एकत्र टीम करावी. दोन्ही पक्षाच्या गट व गण प्रमुखांनी गणांचा दौरा करून मतदारांशी थेट भेटावं असं सांगत पंकजाताई मुंडे म्हणाल्या, मी मंत्री असताना मतदारसंघांत खूप निधी दिला, सत्ता गेल्यावर अडीच वर्षे मी दिलेलीच कामे सुरू होती. मतदारसंघातील सगळ्याशी माझे ऋणानुबंध आहेत. हक्काने तुम्ही मला सर्व सांगू शकता. सर्व स्थिती सकारात्मक आहे त्यामुळे अशी संधी परत येणार नाही. मला राजकारणाचा आणि प्रशासनाचा अनुभव असल्याने याचा उपयोग विकासासाठी करत राहील. मागील पाच वर्षांत पद नसतांना लोकांशी अटेचमेन्ट ठेवली. बरीच कामे केली. इथला रेल्वेचा थांबा पूर्ववत करून देऊ.काहीच अडचण येणार नाही. खासदार झाल्यास पंतप्रधान मोदींकडून मी हक्काने काम करून घेऊ शकते. याचा आपल्या जिल्हयाला फायदाच होईल.राजकारणात जाती-पातीचे खूप तण सध्या उगवले आहे ते तण काढून फेकून द्या. आलेली संधी वाया घालू नका. विरोधक बुद्धिभेद करतील, कारण त्यांचेकडे दुसरा अजेंडा नाही. मुस्लिम, मराठा समाज बांधवांना विकासाचे व्हिजन समजावून सांगा. तुम्ही संधी दिल्यास जिल्ह्याचा चेहरामोहरा बदलून टाकील असा विश्वासही पंकजाताई मुंडे यांनी यावेळी व्यक्त केला. आपल्याला मुंडे साहेबांचे अधुरे स्वप्न पूर्ण करायचे आहे. हे विसरू नका त्यामुळे अधिकाधिक मताधिक्य मिळवण्यासाठी कार्यकर्त्यांनी एक दिलाने काम करावे. असे आवाहनही पंकजाताईंनी केले.मंत्री असताना मी कधी कुणाला त्रास दिला नाही.जातीवादाला थारा दिला नाही त्यामुळे जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी मला पुढची पाच वर्षे सेवा करण्याची संधी द्या.तुमचे मत वाया जाऊ देणार नाही जिल्ह्याचा विकास करून तुमच्या मताची परतफेड करेन असा विश्वास याप्रसंगी पंकजाताई मुंडे यांनी व्यक्त केला.आजच्या दौऱ्यात पंकजाताई मुंडे यांनी सायगाव येथील दर्ग्यात चादर चढवून दर्शन घेतले. यावेळी तिथल्या धर्मगुरूंचे आशीर्वाद घेतले. तसेच उपस्थित मुस्लिम बांधवांशी संवाद साधला. घाटनांदुरकडे मार्गस्थ होत असताना तळणी, हनुमंतवाडी येथील ग्रामस्थांनी वाहनाचा ताफा थांबवून पंकजाताईंचे स्वागत केले.

### निवडणुक प्रक्रियेत सर्वसमावेशक दृष्टीकोन ठेवत काम करा

# लोकसभा सार्वत्रिक निवडणूक प्रक्रिया मुक्त, निर्भय वातावरणात पार पाडावी- निवडणूक निरिक्षक रविकुमार अरोरा




**अहमदनगर । प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने निवडणूकीच्या अनुषंगाने खुप चांगली पूर्वतयारी केली आहे. आपण निवडणूकीच्या महत्वाच्या टप्प्यावर असुन ही निवडणूक प्रक्रिया निर्भय आणि मुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी निवडणूक प्रक्रियेतील सर्व अधिकारी-कर्मचारी यांनी त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या जबाबदाऱ्या अत्यंत संवेदनशील पणे पार पाडाव्यात. निवडणुक प्रक्रियेत सर्वसमावेशक दृष्टीकोन ठेवत काम करण्याचे निर्देश ३७- अहमदनगर लोकसभा मतदार संघाचे निवडणूक निरीक्षक (सामान्य) रविकुमार अरोरा यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित लोकसभा निवडणूकीच्या पूर्वतयारीच्या आढावा बैठकीत श्री अरोरा बोलत होते.

यावेळी ३७- अहमदनगर लोकसभा मतदार संघाचे निवडणूक निरीक्षक (खर्च) शक्ती सिंग, ३८-शिर्डी लोकसभा मतदार संघाचे निवडणूक निरीक्षक (सामान्य) अजय कुमार बिष्ट, निवडणूक निरीक्षक (खर्च) ममता सिंग, निवडणूक निरीक्षक (पोलीस) एम. व्ही.जया गौरी, जिल्हाधिकारी तथा ३७-अहमदनगर लोकसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी सिद्धाराम सालीमठ, अपर जिल्हाधिकारी तथा ३८-शिर्डी लोकसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी बाळासाहेब कोळेकर, जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) राहुल पाटील आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी श्री. अरोरा म्हणाले की, जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी आणि जिल्हा पोलीस अधिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली लोकसभा निवडणूकीच्या अनुषंगाने करावयाची सर्व प्रक्रीयेची पुर्वतयारी खुप चांगल्या प्रकारे केली आहे. परंतू केलेल्या पुर्वतयारीची प्रत्यक्षात योग्य अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. आपण निवडणूकीच्या महत्वाच्या टप्प्यावर आहोत, त्यामुळे सर्व अधिकाऱ्यांनी आपल्या अधिनस्त कर्मचाऱ्यांना चांगले प्रशिक्षित करावे. भारत निवडणूक आयोगाने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार प्रत्येक मतदान केंद्रावर मूलभूत सुविधा असणे बंधनकारक आहे. सध्या उन्हाची तीव्रता वाढत असून मतदानाच्या तारखेपर्यंत ती अधिक वाढणार आहे. त्यामुळे मतदारांना उन्हापासून संरक्षणासाठी शेड व्यवस्था, वैद्यकीय उपचार किट, मदत कक्ष पिण्याचे पाणी यासारख्या सुविधा सहायक निवडणूक अधिकारी यांनी आपल्या मतदार संघात आहेत का ? याची खात्री करुन घ्यावी. प्रामुख्याने ग्रामीण भागातील मतदान केंद्रावर आवश्यक सोयी सुविधा आहेत का? ज्या मतदान केंद्रावरुन वेबकास्टींग होणार आहे तेथील इंटरनेट सुविधा सुरळीत राहील याची काळजीघ्यावी. तसेच दूरस्थसह इतर सर्व मतदान केंद्राची अधिकाऱ्यांनी संयुक्तपणे मार्गाची देखील तपासणी करावी. ज्या ठिकाणी त्रुटी आहेत त्या सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. सी- व्हिजिल या पवर येणाऱ्या तक्रारीचे तातडीने निवारण होईल याची काळजी घेण्यात यावी. निवडणुकीच्या अनुषंगाने देण्यात येणाऱ्या परवानग्या सुविधा पमधून देण्यात याव्यात. निवडणूक आयोगाने निवडणुकीच्या अनुषंगाने उपलब्ध करून दिलेल्या सर्व पचा पुरेपूर वापर करण्यात यावा. मतदानाच्या दिवशी प्रत्येक मतदान केंद्रावर मॉकपोलच्या वेळी पोलिंग एजंटना उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात याव्यात. निवडणुकीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या एफएसटी, एसएसटी,व्हीएसटी या पथकांनी अधिक दक्षपणे काम करण्याच्या सूचनाही यावेळी निवडणूक निरिक्षक (सामान्य) श्री अरोरा यांनी उपस्थित नोडल अधिकाऱ्यांना दिल्या. ३८- शिर्डी मतदार संघाचे निवडणूक निरीक्षक (सामान्य) अजय कुमार बिष्ट म्हणाले की, लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी गठीत विविध पथकांनी अधिक कार्यक्षमपणे काम करावे. निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करत ही निवडणूक यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांनी एकसंघपणे काम करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. निवडणूक निरीक्षक (खर्च) शक्ती सिंग व ममता सिंग यांनी निवडणूक कालावधीत मतदार संघात प्रसारीत होणाऱ्या राजकीय पेड न्यूज आणि राजकीय पुर्वप्रमाणिकरण न केलेल्या जाहिरातीं, तसेच सोशल मिडीयावरील जाहिरातीवर माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समितीने (एमसीएमसी) लक्ष ठेवावे. तसेच संशयीत पेडन्युजवरही करडी नजर ठेवत निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराचा प्रत्येक खर्च नोंद होईल यादृष्टीने सर्व पथकांची काम करण्याच्या सूचना यावेळी दिल्या. ३८- शिर्डी मतदार संघाच्या निवडणूक निरीक्षक (पोलीस) एम. व्ही. जया गौरी म्हणाल्या की, निवडणुकीच्या अनुषंगाने पोलीस विभागाने तयारी पुर्ण केली आहे. परंतु जे नियोजन केले आहे, त्याची योग्य अंमलबजावणी करावी. तसेच निवडणुक प्रक्रियेमध्ये व्यत्यय आणणाऱ्या व्यक्तींचा शोध घेवून त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी. तसेच निवडणूक आयोगाकडून देण्यात आलेल्या सूचनांची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. सर्व प्रथम जिल्हाधिकारी तथा ३७ - अहमदनगर लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने दोनही लोकसभा मतदारसंघात करण्यात आलेल्या तयारीची माहिती पॉवर पॉईंटच्या माध्यमातून दिली. जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी पोलीस प्रशासनाच्या तयारीची माहिती दिली.या बैठकीस सर्व सहायक निवडणुक अधिकारी, नोडल अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, निवडणूक प्रक्रियेशी संबंधीत अधिकारी उपस्थित होते.

## महाविकास आघाडीच्या उमेदवाराच्या प्रचारासाठी भाकप सरसावले

### जिल्हा कौन्सिलच्या बैठकीत पदाधिकारी व कार्यकर्त्यांना सूचना

**अहमदनगर । प्रतिनिधी**



भारतीय कम्युनिस्ट पक्षाची जिल्हा कौन्सिलची बैठक जेष्ठ कम्युनिस्ट नेते कॉ. श्रीधर आदिक यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बुरुडगाव रोड येथील पक्षाच्या जिल्हा कार्यालयात झालेल्या या बैठकीत सविस्तर चर्चा होऊन लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे नगर दक्षिणचे उमेदवार निलेश लंके व शिर्डी लोकसभेचे उमेदवार भाऊसाहेब वाकचौरे यांना सक्रिय पाठिंबा देण्यात आला. तर जनविरोधी सरकारचा पराभव करण्यासाठी भाजप हटाव देश बचावचा नारा देऊन जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांना या उमेदवारांच्या प्रचारार्थ सूचना करण्यात आल्या.

या बैठकीसाठी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सेक्रेटरी कॉ. ड. सुभाष लांडे, जिल्हा सेक्रेटरी कॉ. ड. बन्सी सातपुते, जिल्हा सहसेक्रेटरी कॉ.ड. सुधिर टोकेकर, कॉ. कारभारी उगले, कॉ. बाबा आरगडे, कॉ. लक्ष्मण नवले, कॉ. बापूराव राशिनकर, कॉ. पांडुरंग शिंदे, कॉ. संतोष खोडदे, कॉ. संजय नांगरे, कॉ. सतिश पवार, कॉ. भारती न्यालपेल्ली, कॉ. सुरेश पानसरे, कॉ. प्रताप सहाने आदी उपस्थित होते.

कॉ. ड. सुभाष लांडे म्हणाले की, भारतीय कम्युनिस्ट पक्षाने या पूर्वीच भारतीय जनता पक्षाचे जनविरोधी सरकारचा पराभव करण्यासाठी भाजप हटाव देश बचाव जनजागरण मोहीम हाती घेतली होती. आयटक कामगार संघटनेच्या वतीने कोल्हापूर ते नागपूर महासंघर्ष यात्रा काढून भाजपच्या कामगार शेतकरी विरोधी धोरणाचा निषेध करून ३४ जिल्ह्यातून महासंघर्ष यात्रा काढून नागपूर हिवाळी अधिवेशनावर ६० ते ७० हजार कामगार कर्मचाऱ्यांनी महामोर्चा काढला होता. नरेंद्र मोदी यांच्या दहा वर्षांच्या कार्यकाळात २०१४ ला दिलेले एक ही आश्वासन पूर्ण झाले नसूम, उलट शेतकरी व कामगार विरोधी धोरण घेऊन कार्पोरेट धार्जिणे धोरणे घेऊन अदानी, अंबानी यांच्या हितासाठी सार्वजनिक उद्योग खाजगी करून महागाई वाढविण्यात आली आहे.

कॉ. ड. बन्सी सातपुते म्हणाले की, दरवर्षी दोन कोटी तरूणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याऐवजी खाजगीकरणामुळे रोजगार गेले आहेत. जीएसटीमुळे शेतकरी व सर्वसामान्यांचे जीवन जगणे मुश्किल झाले आहे. स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशी स्वीकारून शेतकऱ्यांना हमी भाव देण्याचे आश्वासन पाळले नाही, त्यामुळे शेतकरी कायमच कर्जबाजारी झाला आहे. याकडे मोदी सरकारने दुर्लक्ष करून शेती धोक्यात आली आहे. त्याचप्रमाणे लढून मिळवलेले कामगार कायदे रद्द करुन उद्योगपतींना हवे तसे कायद्यांत बदल करण्यात आले आहेत. त्यामुळे कामगार असुरक्षित असून, नोकरी टिकविणे कठीण झाले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कॉ.ड. सुधिर टोकेकर म्हणाले की, कामगार कायदे बदलू पाहणारे भाजप सरकारला कामगार वर्गाने त्यांना त्यांची जागा दाखवून द्यावी. नवीन कामगार कायदे लागू झाल्यास कामगार वर्गांना बऱ्याच समस्यांना सामोरे जावे लागणार आहे. भांडवलदारांचे हित साधणारे कायदे असून, हे सरकारच भांडवलदाराचे आहे. हे सरकार उलथविण्याचे काम सर्वसामान्यांना करावे लागणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सर्वसामान्य कामगार व शेतकरी वर्गाचे प्रतिनिधित्व करणारे महाविकास आघाडीचे उमेदवार निवडून आणून त्यांना लोकसभेत पाठविण्यासाठी भारतीय कम्युनिस्ट पक्ष सक्रीय झाले असल्याचे जाहीर करण्यात आले. तर गाव पातळीवरील कार्यकर्त्यांना यावेळी सूचना करण्यात आल्या.

## कोहिनुर परिवाराची ना राधाकृष्ण विखे यांनी घेतली भेट



**अहमदनगर । प्रतिनिधी**

लोकसभेचे महायुतीचे उमेदवार डॉ.सुजय विखे पाटील यांच्या प्रचारार्थ आज कापडबाजारातील कोहिनुर या वस्त्रदालनाला पालकमंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांनी भेट देऊन कोहिनुर परिवाराला खा सुजय विखेंना मत देऊन निवडून देण्याचे आवाहन केले यावेळी संचालक अश्विन गांधी,मॅनेजर योगेश गांधी,रवींद्र भळगट , महेश बोगा,अशोक शेंडे,रमेश गुज्जा ,अशोक दिवटे सह कोहिनुर परिवारातील कर्मचारी कामगार यासह महायुतीचे पदाधिकारी अभय आगरकर,वसंत लोढा,बाबासाहेब वाकळे ,सचिन पारखी आदीं उपस्थित होता

यावेळी अनेक श्री गांधी यांनी कै प्रदीप शेठ गांधी यांच्या मागील निवडणुकीच्या आठवणी सांगितल्या व आपले मनोगते व्यक्त केली ,ना विखे नी मनोगत व्यक्त करून खा सुजय विखेंना निवडून देण्याचे आवाहन केले.

## गुरु शिष्यांना दिला पालकांनी आनोखा निरोप आणि केले नवागतांचे स्वागत

**अहमदनगर । प्रतिनिधी**



जिल्हा परिषद प्राथ. शाळा सारोळा स्टेशन येथे पालकांच्या उपस्थितीत इयत्ता पाहिली प्रवेशोत्सव मेळावा, इयत्ता चौथी च्या मुलांना निरोप देण्यात आला.महिलांनी इयत्ता पहिली प्रवेशीत मुलांचे औक्षण केले .ढोल ताशांच्या गजरात मुलांची वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली.तसेच सारोळा स्टेशन शाळेचे शिक्षक संजय रभाजी काळे आणि अकोळनेर केंद्राचे केंद्रप्रमुख रामदास इंगळे साहेब यांच्या सेवानिवृत्ती निमित्त ग्रामस्थांनी संजय काळे गुरुजी व केंद्रप्रमुख रामदास इंगळे या दोघांचाही सपत्नीक सत्कार केला. यावेळी पालकांनी व सत्कारमूर्ती रामदास इंगळे व शिक्षक संजय काळे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना शैक्षणिक सेवेतील मौलिक अनुभव व शाळेसाठी भौतिक सुविधांसाठी पालकांनी केलेल्या मदतीबद्दल समाधान व्यक्त करून गुणवत्ते साठी सतत आग्रही राहिल्याचे नमूद केले . तसेच संजय काळे यांनी पहिली ते चौथी इयत्तेतील सर्व विद्यार्थ्यांना स्पोर्ट गणवेश भेट म्हणून दिला. यावेळी सृष्टी चांगदेव कडूस, अर्जुन तात्याराम कडूस ,श्रेयश थोरात, स्वरा धामणे या विद्यार्थ्यांनी भाषणे केलीकार्यक्रमास गुरुमाता विमल सर्जेराव धामणे,शाळा व्यव . समितीचे अध्यक्ष बाळासाहेब धामणे, उपाध्यक्ष मनेश धामणे, दत्ता महाराज कडूस, बाळासाहेब धामणे, नानासाहेब पारधे, अविनाश धामणे, शुभांगी काळे, सुकन्या धामणे, स्वाती धामणे ,सोनाली धामणे, मनिषा धामणे, मा .केंद्रप्रमुख आत्माराम धामणे, मा . मुख्या . संजय धामणे, नानासाहेब जाधव, रमेश काळे, अरुण काळे, विजय काळे, सुभाष काळे, विठ्ठल काळे, अनिता कडूस, मनिषा थोरात,तुषार धामणे, स्वप्निल थोरात, बाळासाहेब साळवे ,विजय साळवे साहेब, डॉ . श्रीकांत देशपांडे, मच्छिंद्र काळे, मंगेश धामणे, रघू धामणे, बंडू धामणे, अनिल धामणे, राजू शेख व शाळेचे सर्व पालक, ग्रामस्थ अकोळनेर केंद्रातील सर्व मुख्याध्यापक उपस्थित होते . कार्यक्रम अध्यक्ष माजी केंद्रप्रमुख किशोर हारदे यांनी शाळेने राबवलेल्या विविध उपक्रमांबद्दल कौतुक केले. 'शिक्षकांनी आपले काम प्रामाणिक पणे केले तर त्यांची स्वतःची मुले आपो आप शिकतात. तसेच मंथन राज्यस्तरीय प्रज्ञा शोध परीक्षा१००% निकाल व लक्ष्यवेध राज्यस्तरीय प्रज्ञा शोध परीक्षा१००% निकाल आणि मिशन आरंभ जिल्हा परिषद अहमदनगर यापरीक्षेमध्ये यश संपादन केल्याबद्दल मुलांचे प्रमाणपत्र देवून कौतुक केले . कार्यक्रमाचे सूत्रसंचलन अनिल कडूस यांनी केले तर कार्यक्रमाचे प्रास्तविक व आभार शाळेच्या शिक्षिका रेश्मा गांगर्डे यांनी केले .

## संपुर्ण देशात केवळ दहा जागा लढवता, अन संसद बंद पाडण्याची भाषा करता ?

### मतदारांनी थापांना बळी पडू नये : विनायक देशमुख

**अहमदनगर । प्रतिनिधी**



सध्या लोकसभेच्या निवडणुकीत अहमदनगर (अहिल्यानगर) लोकसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) गटाचा उमेदवार निवडणूक लढवित आहे. या पक्षाने संपूर्ण देशभरात केवळ १० उमेदवार उभे केले आहेत. त्यापैकी किती निवडून येतील हे त्यांचे त्यांनाच माहीत. पण त्यांचा उमेदवार मात्र त्यांच्या पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा समोरच संसद बंद पाडण्याची भाषा करतो, हा एक विनोदच म्हणावा लागेल, कुणीतरी त्यांना सांगावे लागेल अरे बाबा,संसद म्हणजे काही ग्रामपंचायत नाही. आले मनात कि पाडली संसद बंद. असे तिथे चालत नाही. संसद बंद पाडण्यासाठी खासदारांची आवश्यक संख्या लागते, अशा खरपूस शब्दात भाजपाचे नेते श्री. विनायक देशमुख यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) गटाच्या उमेदवाराचा समाचार घेतला.

माजी मंत्री व जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष श्री.शिवाजीराव कर्डिले यांच्या निवासस्थानी आज नगर तालुक्यातील प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी सर्वश्री शिवाजीराव कर्डिले, दिलीप भालसिंग, अक्षय कर्डिले, भाऊसाहेब बोठे व तालुक्यातील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी बोलताना श्री. देशमुख म्हणाले, मी १९९२ च्या लोकसभा निवडणुकीपासून या प्रक्रियेत सहभागी आहे. पण मागील ३२ वर्षात या निवडणुकीत प्रचाराचा स्तर अत्यंत खालावलेला असून थापा मारण्याची स्पर्धा सुरू झाली आहे की काय ?, असे वाटते. काही उमेदवारांना तर संसद म्हणजे ग्रामपंचायत आहे की काय असे वाटू लागले आहे. गाव पातळीवर किंवा तालुका पातळीवर थापा मारणे एक वेळ समजू शकते. परंतु लोकसभेच्या २५ लाख मतदारांना थापा मारणे हे अत्यंत दुर्दैवी आहे. लोकसभेची निवडणूक सुरू झाली आणि एका उमेदवाराने जाहीर केले की माझा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी राहुल गांधी येणार आहेत. मला काँग्रेसचा ३५ वर्षाचा अनुभव असल्यामुळे या बातमीचे मला जरा आश्चर्यच वाटले. पण असेही वाटले की कदाचित त्या उमेदवाराची राहुल गांधी बरोबर मैत्री असु शकते. त्यामुळे राहुल गांधी कदाचित येतील सुद्धा !!. त्यानंतर काही दिवसांनी त्याच उमेदवाराचे वक्तव्य आले की वाहतुकीला त्रास होईल म्हणून मीच राहुल गांधींना येऊ नका असे म्हटले. मागील ३०-३५ वर्षाच्या राजकारणात नगरच्या जनतेला एवढा बालिशपणा प्रथमच अनुभवायला मिळाला.या पुढील काळात देखील राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गटाचा) उमेदवार अजूनही मोठमोठ्या थापा मारण्याची शक्यता आहे. मात्र जनतेने त्यांना स्पष्टपणे विचारायला हवे कि आपण संपुर्ण देशात केवळ दहाच जागा लढवता?. मग तुमच्या या थापा कशा खऱ्या होतील ?. तुमच्या पेक्षा महाराष्ट्रात वंचित बहुजन आघाडी आणि एम.आय.एम. हे पक्ष जास्त जागा लढवीत आहेत. मग तुम्ही दिलेली आश्वासने कशी काय पूर्ण करणार. ?मतदारांनी अशा भुलथापांना बळी न पडता आपल्याला ग्रामपंचायतीचा सरपंच निवडायचं नसून देशाचा पंतप्रधान निवडायचा आहे, याचे भान ठेवावे आणि श्री. नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान बनविण्यासाठी कमळा समोरील बटन दाबुन खा.डॉ. सुजय विखे पा. यांना प्रचंड मतांनी विजयी करावे, असे आवाहन श्री. विनायक देशमुख यांनी केले आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .